वाचले :

१) जैव वैद्यकीय कचरा अधिनियमं, २०१६.
२) शासन परिपत्रक क्र.संकिर्ण २०१७/प्र.क्र.४४/आरोग्य ३ दि.०४/०४/२०१९.
३) म.प्र.नि. मंडळ, मुंबई यांचे समिती गठीत करण्याबाबतचे पत्र क्र. MPCB-PSO दि. १३/०३/२०१९.

---

जावक क्र. मप्रनियं/उप्राआसो/१०५६
दि. 02/08/2019

**विषय :- जैविक वैद्यक कचरा (BMW)बाबत जिल्हास्तरीय सल्लागार समिती स्थापन करणेबाबत...**

आदेश

ज्याअर्थी, जैव वैद्यकीय कचरा अधिनियम, २०१६ अंतर्गत नियमांची योग्यरित्या अंमलबजावणी केली जाते अथवा नाही यावर देखरेख ठेवणे करिता उपरोक्त नमुद केलेल्या शासन निर्णयाद्वारे (संदर्भ क्र. २) द्वारे जिल्हास्तरीय समिती स्थापन करणेबाबत आदेशित करण्यात आलेले आहे.

त्यानुसार **जैविक वैद्यक कचरा** (BMW)**बाबत सोलापूर जिल्हयाकरिता जिल्हास्तरीय सल्लागार समिती** खालीलप्रमाणे गठीत करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २ | जिल्हा शल्यचिकित्सक | सदस्य |
| ३ | जिल्हा आरोग्य अधिकारी | सदस्य |
| ४ | उप आयुक्त, महानगरपालिका | सदस्य |
| ५ | मुख्य आरोग्य अधिकारी, महानगरपालिका | सदस्य |
| ६ | प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे यांचे प्रतिनिधी | सदस्य सचिव |
| ७ | इंडीयन मेडिकल असोशिएशन | प्रतिनिधी |

सदर समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे आहे.

समितीची कार्यकक्षा -

१) जैव वैद्यकीय कचरा अधिनियम,२०१६ अंतर्गत नियमांची जिल्हास्तरावर योग्यतिरत्या अंमलबजावणी केली जाते अथवा नाही यावर देखरेख ठेवणे.
२) समितीची त्रैमासिक बैठक घेणे.
३) मुंबई नर्सिंग होम रजिस्ट्रेशन ॲक्ट १९४९ च्या अंमलबजावणीचा आढावा घेणे.
४) खाजगी व शासकीय रूग्णालयाचा जैव वैद्यकीय कचरा (BMW) नोंदणीबाबत आढावा घेणे.
५) रूग्णालयात किती जैव वैद्यकीय कचरा निर्माण होतो व त्याची विल्हेवाट कशी लावली जाते याबत आढावा घेणे.
६) जैव वैद्यकीय कचरा विल्हेवाट लावण्यासाठी Common Treatement and Disposal Facility याचा आढावा घेणे.
७) जैव वैद्यकीय कचरा बाबत शासकीय व खाजगी रूग्णालयाच्या अडी अडचणी जाणून घेणे.
८) जैव वैद्यकीय कचऱ्याचा साठवणूक व विल्हेवाट यासाठी परिणामकारक उपाय योजनाबाबत उपाय सुचविणे व अंमल बजावणी करणे.
९) क्षेत्रीय भेट देऊन पाहणी करणे.
१०) जैविक वैद्यक कचरा बाबत इतर अनुषांगिक बाबींवर चर्चा व निर्णय घेणे.

उपरोक्त जिल्हास्तरीय सल्लागार समितीने समितीच्या विहीत कार्यकक्षेनुसार कार्यवाही करावी.

जिल्हाधिकारी, सोलापूर
तथा अध्यक्ष जिल्हा स्तरिय सल्लागार समिती

प्रत सोबत : सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय दि. ०४/०४/२०१९.